# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ११०/२०२०**

कोव्हिड–१९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या अधिकार मंडळांनी निश्चित केलल्या मार्गदर्शक तत्वानुसार अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमातील (Regular, Backlog & Repeater) विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० पासून करण्यात आले असून या अनुषंगाने सर्व अभ्यासक्रमांची वेळापत्रके विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. तसेच online किंवा offline पध्दतीने परीक्षा देण्याचा विकल्प विद्यार्थ्यांकडून घेण्यात आला आहे. तथापि ज्या विद्यार्थ्यांनी कोणताही विकल्प दिला नाही असे सर्व विद्यार्थी online पध्दतीने परीक्षा देऊ शकतात. अशा सर्व विद्यार्थ्यांना यासंबंधीची माहिती त्यांच्या Student Exam Form Profile मध्ये उपलब्ध करुन दिलेली आहे.

दिनांक ७ ऑक्टोबर, २०२० रोजी झालेल्या सभेमध्ये मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार जे विद्यार्थी खालील कारणास्तव परीक्षा देऊ शकणार नाहीत, त्यांच्यासाठी नजिकच्या कालावधीमध्ये विशेष परीक्षेचे आयोजन करण्यात येईल व याची माहिती वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

१. समकक्ष विषयामुळे अथवा इतर कारणांमुळे एकाच वेळी विद्यापीठाच्या दोन विषयांच्या परीक्षा असल्यास.
२. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (CET)/इतर शासकीय स्पर्धा परीक्षा इ. चे आयोजन विद्यापीठ परीक्षेच्या दिवशी असल्यास.
३. विद्यार्थ्यांस स्वत:ला कोव्हिड –१९ विषाणुची बाधा झाली असल्यास.

उपरोक्त नमूद कारणासाठी विशेष परीक्षेस बसण्याची परवानगी मिळण्यासाठी विद्यार्थ्यांने सर्व आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या प्रती महाविद्यालये/संस्थेच्या मा. प्राचार्य/ संचालक यांच्यामार्फत परीक्षा समन्वय कक्षात सादर करणे आवश्यक आहे.

सर्व प्राचार्य /संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांना विनंती की, सदर परिपत्रकाचा आशय सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावा व विद्यापीठास सहकार्य करावे.

संदर्भ : परीक्षा–समन्वय/३८२
दिनांक : ०७/१०/२०२०

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ